महाराष्ट्र शासन

कार्यालय :- जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर

पत्ता :- प्लॉट नं.८ "सहकार सदन" हिंदुस्थान कॉलनी, अमरावती रोड, नागपूर

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

१९८९९

जा.क्र.जिउनिना/नियमन/क.८८/नासपत/ /१२

दिनांक :- ०४/१२/२०१२

वाचा :-

१. या कार्यालयाचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश क्र. जा.क्र.जिउनिना/नियमन/कलम ८८/नागमित्र/७०१७/१२, दिनांक ११ मे, २०१२
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांचे पत्र दिनांक १४/८/२०१२ व ३१/८/२०१२
३. या कार्यालयाचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये सुधारीत आदेश क्र. जा.क्र.जिउनिना/नियमन/कलम ८८/नासपत/१६७९०/१२, दिनांक २८/९/२०१२
४. श्री.नि.ह.देवतळे, प्राधिकृत चौकशी अधिकारी, यांचे पत्र दिनांक ... ऑक्टोबर २०१२
५. या कार्यालयाचे पत्र क्र.१८८३५, दिनांक २१/११/२०१२
६. श्री.झेड.डी.शेंडे, निवृत्त सदस्य (न्यायाधिश), सहकार अपील, न्यायालय नागपूर व चौकशी अधिकारी, नागपूर यांचे पत्र दिनांक २९/११/२०१२

नागमित्र नागरी सहकारी पत संस्था मर्या.नागपूर र.नं.७०९ या संस्थेची संदर्भीय क्रमांक १ चे आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी करण्याकरीता प्राधिकृत अधिकारी म्हणून तत्कालीन श्री.अजय भिमराव कडू, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालूका नागपूर, जिल्हा नागपूर यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. श्री.अजय भिमराव कडू, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालूका नागपूर, जिल्हा नागपूर यांची वर्ग-२ या संवर्गातून वर्ग-१ या संवर्गात उपनिबंधक, सहकारी संस्था, या पदावर पदोन्नती झालेली असून ते सदरच्या पदावर दिनांक २६/७/२०१२ रोजी रुजू झालेले आहेत. त्यांनी संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये त्यांचेकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशीची कार्यवाही जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा या पदाचा कामकाजाचा व्याप, मुख्यालयाचे अंतर व चौकशीची व्याप्ती इत्यादी बाबी विचारात घेता करता येत नसल्याचे नमूद करुन त्यांचे ऐवजी अन्य अधिकाऱ्याची नियुक्ती करावी अशी सस्नेह विनंती केलेली असल्यामूळे त्यांची विनंती मान्य करुन या कार्यालयाचे संदर्भीय क्र.३ चे आदेशान्वये श्री.नि.ह.देवतळे, प्राधिकृत चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली होती.

श्री.नि.ह.देवतळे, सेवानिवृत्त सहनिबंधक, सहकारी संस्था तथा प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी त्यांचे संदर्भीय पत्र क्र.४ नुसार ते १९ नोव्हेंबर २०१२ ते १९ मार्च २०१३ या कालावधीत परदेशात (इंग्लंड) येथे जाणार असून चौकशीस वेळ देणे शक्य नाही असे या कार्यालयास कळविले असल्यामूळे या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र.५ अन्वये नागपूर जिल्हयाकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ व ८८ चे चौकशी करीता नियुक्त केलेल्या पॅनलवरील चौकशी अधिकारी यांची उपरोक्त संस्थेची चौकशी करण्याकरीता सहमती मागविली असता श्री.झेड.डी.शेंडे यांनी त्यांचे संदर्भीय पत्र क्र.६ अन्वये संम्मती दिलेली आहे.

सबब, संदर्भीय क्र.३ च्या आदेशामध्ये अंशतः बदल करुन नागमित्र नागरी सहकारी पत संस्था मर्या.नागपूर र.नं.७०९ या संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत चौकशी पूर्ण करणेकरीता खालील प्रमाणे सुधारित आदेश पारित करीत आहे.

### //सुधारीत आदेश//

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ तसेच महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना क्रमांक सी.एस.एल.१४९३/११६२/सी.आर.-४७/१५-सी, दिनांक ७/८/१९९३ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या

...२...

34

अधिकारानुसार मी, गौतम वालदे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर याव्दारे नागमित्र नागरी सहकारी पत संस्था म.नागपूर, र.नं.७०९ या संस्थेच्या सन २००६-२००९ या कालावधीच्या फेरलेखापरिक्षण अहवालात नमुद संदर्भीय क्र.१ च्या आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये मुद्दा क्रमांक १ ते ६२ मुद्दयांनुसार संस्थेच्या मालमत्तेचे उपयोजन केले आहे व त्या संबंधात उत्तरदायी किंवा जबाबदार आहे किंवा संस्थेच्या बाबतीत कोणतेही अपकार्य किंवा विश्वासघात करुन संस्थेचे आर्थिक नुकसान केलेले आहे व या नुकसानीकरीता कोण किती प्रमाणात जबाबदार आहे त्याची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व त्याखालील नियम १९६१ चे नियम ७२ नुसार चौकशी करण्याकरीता प्राधिकृत अधिकारी म्हणून **श्री.झेड.डी.शेंडे, निवृत्त सदस्य (न्यायाधिश), सहकार अपील, न्यायालय, नागपूर** यांची नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकाऱ्याने संदर्भीय क्र.१ च्या आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" नुसार चौकशी करुन तसा अहवाल आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आंत तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावा.

सदर आदेश आज दिनांक ०४/१२/२०१२ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी पारित करण्यात येत आहे.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ★ नागपूर ★

(गौतम वालदे)
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, नागपूर

प्रति,

१) श्री. **श्री.झेड.डी.शेंडे, निवृत्त सदस्य (न्यायाधिश), सहकार अपील, न्यायालय, नागपूर** तथा चौकशी अधिकारी यांना माहिती करीता. आपणास कळविण्यात येते की, सदरहू संस्थेचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत चौकशी सहा महिन्याच्या आंत करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) श्री.अजय कडू, तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालूका नागपूर तथा प्राधिकृत चौकशी अधिकारी, यांना माहिती करीता रवाना. आपणास कळविण्यात येते की, सदरहू संस्थेचे चौकशी संबंधाचे दस्ताऐवज श्री **श्री.झेड.डी.शेंडे, निवृत्त सदस्य (न्यायाधिश), सहकार अपील, न्यायालय, नागपूर** चौकशी अधिकारी यांना सोपविण्यात यावेत व तसे या कार्यालयास कळवावे.

३) श्री.नि.ह.देवतळे, सेवानिवृत्त सहनिबंधक, सहकारी संस्था, तथा चौकशी अधिकारी यांना माहिती करीता सस्नेह रवाना.

४) प्रशासक, नागमित्र नागरी सहकारी पत संस्था मर्या.नागपूर र.नं.७०९ यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरहु चौकशी करीता जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचे पी.एल.ए. अकॉऊंट मध्ये रु.७०,०००/- (अक्षरी सत्तर हजार फक्त) त्वरीत जमा करावेत व तसे या कार्यालयास उलट टपाली कळवावे.

**प्रतिलिपी माहिती करीता सविनय सादर.**

१) मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे-१

२) मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर

**प्रतिलिपी माहिती करीता सस्नेह रवाना.**

१) जिल्हा विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, नागपूर

जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, नागपूर

T.C.

Assistant Registar
Co-operative Societies Nagpur.